# बोर्ड प्रश्नपत्रिका : फेब्रुवारी २०२४

## वाणिज्य संघटन व व्यवस्थापन

**वेळ : ३ तास** | **एकूण गुण : ८०**

Target Publications

**सूचना :**

(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
(२) उजव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.
(३) डाव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.
(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराची सुरुवात नवीन पानावर करावी.

**प्र.१. (अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा :** (५)[२०]

(१) _________ ह्यांना शास्त्रीय व्यवस्थापनाचा जनक म्हणून ओळखले जाते.
(अ) हेनरी फेयॉल (ब) एफ. डब्ल्यू टेलर (क) फिलिप कोटलर

(२) स्टार्ट अप इंडिया _________ चा उपक्रम आहे.
(अ) आर.बी.आय (ब) भारत सरकार (क) जागतिक बँक

(३) _________ वाहतुकीमुळे घरपोच सेवा दिली जाते.
(अ) रेल्वे (ब) हवाई (क) रस्ते

(४) आर्थिक वाढ आणि देशाच्या सुरक्षिततेसाठी _________ स्थिरता आवश्यक असते.
(अ) राजकीय (ब) सामाजिक (क) आर्थिक

(५) भारतात ग्राहक संरक्षण कायदा सर्वप्रथम _________ वर्षी अस्तित्वात आला.
(अ) १९४७ (ब) १९८९ (क) १९८६

**(ब) योग्य जोड्या जुळवा :** (५)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) निर्देशनातील एकवाक्यता | (१) माहितीचा अधिकार |
| (ब) नियोजन | (२) व्यवस्थापनाचे अंतिम कार्य |
| (क) गोदाम | (३) विशिष्ट नाव |
| (ड) ग्राहक अधिकार | (४) एक वरिष्ठ एक योजना |
| (इ) नोंदणीकृत बोधचिन्ह | (५) विक्रेता |
| | (६) व्यवस्थापनाचे प्राथमिक कार्य |
| | (७) समय उपयोगिता |
| | (८) सामान्य मार्गदर्शक तत्त्वे |
| | (९) व्यापारी चिन्ह |
| | (१०) स्थळ उपयोगिता |

**(क) खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते लिहा :** (५)

(१) संघटनात्मक कार्य सुरळीत होण्यासाठी सहकार्याची आवश्यकता नसते.
(२) चालू खाते कर्मचारी उघडतात.
(३) बाह्यसेवा पुरविणाऱ्या संस्थेच्या मदतीने कंपनी महत्त्वाच्या क्षेत्राकडे लक्ष पुरवू शकते.

(४) विक्रेत्याने ग्राहकाच्या अधिकारास मान्यता दिली पाहिजे.

(५) विपणी (मार्केट) हा शब्द लॅटिन भाषेतील 'मार्केट्स' शब्दापासून आलेला आहे.

**(ड) गटात न बसणारा शब्द शोधा :** (५)

(१) निवड, प्रशिक्षण, समन्वय, नियुक्ती

(२) नाबार्ड, आर.बी.आय., सिडबी, एक्झिम

(३) डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, आधार कार्ड, ए. टी. एम.

(४) नोकरीची सुरक्षितता, आरोग्य व सुरक्षिततेची साधने, कामाची सुयोग्य स्थिती, योग्य प्रमाणात नफा

(५) किंमत, व्यक्ती, विक्रयवृद्धी, उत्पादन

**प्र.२. खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही चार) :** **[८]**

(१) शिस्तीचे तत्त्व
(२) संदेशवहन / संप्रेषण
(३) व्यवसाय नीतिशास्त्र
(४) कंपन्यांची सामाजिक जबाबदारी (CSR)
(५) वस्तू / सेवा निवडीचा अधिकार
(६) विपणी (MARKET)

**प्र.३. खालील घटना किंवा प्रसंगाचा अभ्यास करून आपले मत लिहा (कोणतेही दोन) :** **[६]**

(१) XYZ कंपनीत, श्री. लेले त्यांच्या अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सूचना देतात. मार्गदर्शन करतात आणि त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्यांना प्रेरित करतात. तर दुसरीकडे श्री. सय्यद संघटनात्मक उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी विविध विभागातील कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामात सुसंवाद साधण्यासाठी प्रयत्न करतात. श्री. देसाई व्यावसायिक संघटनेला आवश्यक संसाधनांची व्यवस्था पाहतात.
खालील कार्यामध्ये गुंतलेल्या कर्मचाऱ्यांची नावे सांगा.
(अ) संघटन (ब) निर्देशन (क) समन्वय

(२) श्री. अशोक यांनी एका दुकानातून ₹७०० ला बूट खरेदी केले. विक्रेत्याने त्यांना सर्वसाधारण कंपनीचे मोठ्या मापाचे बूट योग्य आहेत म्हणून खरेदी करण्यास सक्ती केली.
घरी पोहचल्यानंतर असे आढळून आले की, श्री. अशोक यांच्यासाठी बूट मोठे झाले आहेत. म्हणून त्यांनी दुकानदाराकडे यासंबंधी तक्रार केली. परंतु, दुकानदाराने बुटाचा साठा असतांनाही बूट देण्यास नकार दिला.
वरील घटनेत :
(अ) ग्राहकाच्या कोणत्या अधिकाराचे उल्लंघन झाले आहे ?
(ब) श्री. अशोक हे खरेदीदार आहेत की अंतिम वापरकर्ते ?
(क) श्री. अशोक यांनी तक्रार कोठे केली पाहिजे ?

(३) श्री. 'अ' हे आयात आणि निर्यात व्यापार करतात. त्यामुळे त्यांना विविध प्रकाराच्या विदेशी चलनाची गरज असते. व्यवसायाच्या विस्तारासाठी ते व्यापारी बँकेतून कर्ज घेतात. आपल्याकडील निधीची ते सामान्य भागांमध्ये गुंतवणूक करतात.
(अ) श्री. 'अ' हे कोठून कर्ज घेतात ?
(ब) श्री. 'अ' हे आपल्याकडील निधीची जेथे गुंतवणूक करतात त्या बाजाराचे नाव सांगा.
(क) आंतरराष्ट्रीय व्यवसायासाठी कोणत्या प्रकारचे चलन आवश्यक असते ?

**प्र.४. खालील फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) :** **[१२]**

(१) निर्देशन आणि समन्वय
(२) रस्ते वाहतूक आणि रेल्वे वाहतूक
(३) करदेय गोदाम आणि करदत्त गोदाम
(४) जिल्हा आयोग आणि राज्य आयोग

Target Publications

**प्र.५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[८]**

(१) हेन्री फेयॉल यांची 'व्यवस्थापनाची' कोणतीही चार तत्त्वे स्पष्ट करा.
(२) उद्योजकाची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
(३) व्यवसाय प्रक्रिया बाह्यसेवा (BPO) चे फायदे स्पष्ट करा.

**प्र.६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) :** **[८]**

(१) संसाधनांचा योग्य तो वापर करण्यासाठी व्यवस्थापनातील तत्त्वांचा उपयोग होतो.
(२) परंपरागत व्यवसायाच्या तुलनेत ई व्यवसायाची स्थापना करणे सोपे आहे.
(३) कामगारांच्या व्यवस्थापनातील सहभागास व्यवसायाने मान्यता द्यावी.
(४) ग्राहकांमध्ये उत्पादनाची ओळख निर्माण करण्यासाठी मुद्रीकरणाची आवश्यकता आहे.

**प्र.७. खालील प्रश्न सोडवा (कोणतेही दोन) :** **[१०]**

(१) नियोजनाचे महत्त्व सांगा.
(२) ई-बँकिंग सेवा स्पष्ट करा.
(३) ग्राहकांचे अधिकार स्पष्ट करा.

**प्र.८.** विमा म्हणजे काय ? जीवनविम्याचे (आयुर्विमा) प्रकार स्पष्ट करा. **[८]**

**किंवा**

विपणन मिश्र म्हणजे काय ? विपणन मिश्रणाचे ७ पी (7Ps) स्पष्ट करा.

Target Publications